अमित गद्रे



शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा. सोबत डॉ. डी. आर. मोरे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी.

# जलसाक्षरताच तारेल

### जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम

'गावागावात पाणी नाही म्हणून लोकांवर घरदार सोडण्याची वेळ आली आहे. एक घागर पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागत आहे. समाजाचे हे दाहक वास्तव बदलून भविष्यातील पाणी टंचाईतून जलसाक्षरताच तारेल' असा विश्वास प्रख्यात जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँड इंजिनीअर्सच्यावतीने 'जागे व्हा पंचगंगेसाठी' अभियान सुरू आहे. अभियानांतर्गत डॉ. राजेंद्रसिंह यांनी कोल्हापुरातील पाणीप्रश्न व त्यावरील उपाय व उपक्रम याविषयी संवाद साधला. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात बुधवारी व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी होते.

डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले, 'पाण्याच्या बाबतीत कोल्हापूर अत्यंत सधन आहे. पाणी साठवणूक, पुनर्वापर यासारख्या क्षेत्रात कोल्हापुरात पाण्यासंदर्भात अनेक प्रयोग करता येतील. यासाठी शिवाजी विद्यापीठ, महापालिका यांच्यासह कोल्हापुरातील सामाजिक व पर्यावरणात काम करणाऱ्या संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. जे प्रयोग होतील ते पाणी बचत व पुनर्वापर यावर आधारीत असले पाहिजेत. डॉ. राजेंद्रसिंह पुढे म्हणाले, आज जगात पाण्याच्या बाबतीत खूप वाईट परिस्थिती आहे. केवळ पाणी नाही नाही म्हणून मोठ्या प्रमाणात स्थलांतर वाढत आहे व त्यातून शहरांवर, महानगरांवर ताण येत आहे. त्यातून वेगळे प्रश्न निर्माण होत आहेत. जगात नागरिकांचे ऐच्छिक स्थलांतर हितकारक आहे. मात्र परिस्थितीजन्य सक्तीचे स्थलांतर हे कधीही हितकारक ठरत नाही. सद्यस्थितीत देशातील स्थलांतर गावांकडून मोठ्या शहरांपुरते मर्यादित आहे. मात्र, त्यामुळेही शहरांवरील एकूणच भार वाढतो आहे. यापुढील काळात मध्य आशिया आणि आफ्रिकेतील नागरिकांप्रमाणे आपल्यावर देश सोडण्याची वेळ येणार नाही, याची दक्षता आपण वेळीच घ्यायला हवी.'

डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले, 'कोल्हापुरातील नदी पूरमुक्त करण्यासाठी ती सातत्याने प्रवाही कशी राहिल यादृष्टीने प्रयोग करण्याची गरज आहे. लोकांना पाणीबचतीचे फायदे सांगणे ही काळाची गरज आहे. शिवाजी विद्यापीठाने आता केवळ पुस्तकी शिक्षण देण्यापुरते सीमित न राहता पाणीटंचाईला परतून लावण्यासाठी जलसाक्षरतेसाठी युवकांना संघटीत केले पाहिजे.'

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठ केवळ आपल्या कॅम्पसवरीलच नव्हे, तर कोल्हापूर शहरासह या जिल्ह्यातील नैसर्गिक स्रोतांच्या संवर्धनासाठीही प्रयत्नशील आहे.'

विनोद बोधनकर यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, अनिल कानडे यांच्यासह पाणीतज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी स्वागत केले.

### कोल्हापुरातील एसटीपी प्लँट योग्य

'कोल्हापुरातील एसटीपी प्लँट अतिशय योग्य असून याचे श्रेय महापालिकेला द्यावे लागेल. अनेकदा एसटीपी प्लँटवर पाण्यासारखा पैसा खर्च होतो पण त्याचा परिपाक शून्य असतो. पांढरा हत्ती पोसल्याप्रमाणे या प्लँटचे काम कागदावर असते. मात्र कोल्हापुरात पाहणी केल्यानंतर एसटीपी प्लँटची रचना योग्य असल्याचे लक्षात आल्यानंतर येथे पाणी पुनर्वापराबाबत चांगले काम होऊ शकते असे दिसले' अशी प्रतिक्रीया डॉ. राजेंद्रसिंह यांनी दिली.

### जयंती नाल्याची नदी व्हावी

'कोल्हापुरात आज जयंती नाला म्हणून ओळख असलेल्या पाणवठ्याचे स्वरूप एकेकाळी जयंती नदी असे होते. पण शहरातील दूषित पाणी जयंती नदी मिसळून तिचा नाला बनला आहे. या नाल्याचे नदीत रुपांतर करण्याची जबाबदारी महापालिकेने घ्यावी' असे आवाहन डॉ. राजेंद्रसिंह यांनी डॉ. कलशेट्टी यांना केले. 'एखादे शहर अधिकाऱ्यांना कामातून लक्षात ठेवत असते. तुम्ही जयंती नाल्याला नदी बनवून गेलात तर कोल्हापूर आयुष्यभर तुमचे ऋणी राहील' असे ते म्हणाले.

# जलसाक्षरता काळाची गरज

## डॉ. राजेंद्रसिंह राणा : 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' मोहिमेंतर्गत कार्यक्रम



**कोल्हापूर : जागतिक जल दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. राजेंद्रसिंह राणा, अजय कोराणे, डी. आर. मोरे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, विनोद बोधनकर आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पाण्यावरून होणारे तिसरे जागतिक महायुद्ध रोखण्यासाठी जलसाक्षरता ही काळाची गरज आहे. विद्यापीठाने जलसाक्षरतेबाबत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले. कोल्हापुरातील गामती व जयंती हे नाले नसून नद्या आहेत. त्यांना त्यांच्या मूळ रूपात प्रवाहित होऊ द्या, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या मोहिमेंतर्गत व जागतिक जल दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

राजेंद्रसिंह राणा म्हणाले, जलसाक्षरतेचे काम महाराष्ट्रात अत्यंत उत्तम पद्धतीने सुरू आहे. देशात महाराष्ट्राचा यात प्रथम क्रमांक लागतो. या मोहिमेमुळे महाराष्ट्र अधिकाधिक पाणीदार होण्यास मदत होत आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक धरणे आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्याही महाराष्ट्रातच होत आहेत. या पार्श्वभूमीवर येथून पुढच्या काळात मध्यवर्ती सिंचन व्यवस्था ही आता कालबाह्य होऊ लागली आहे. एकविसाव्या शतकात आता जमिनीचे जल-पुनर्भरण हाच पाण्यासाठीचा संवर्धनशील उपाय राहणार आहे.

यावेळी कोल्हापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी पर्यावरणाचे संवर्धन करणे गरजेचे आहे. कोल्हापुरात नदी प्रदूषणाबाबत योग्य त्या उपाययोजना करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कोल्हापूर शहरासह या जिल्ह्यातील नैसर्गिक स्रोतांच्या संवर्धनासाठीही प्रयत्नशील आहे. या परिसरातील हे नैसर्गिक वरदान टिकवून ठेवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठ सातत्याने योगदान देत राहील, असे सांगितले. यावेळी विनोद बोधनकर यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत अजय कोराणे यांनी केले. प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी केले.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, अनिल कानडे उपस्थित होते. स्वागत अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. कोराणे यांनी प्रास्ताविक केले. आभार वंदना कुसाळकर यांनी आभार मानले. यावेळी इंजिनिअरिंग असोसिएशनचे पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

सकाळ

# पाण्याअभावीच स्थलांतरणात वाढ

## राजेंद्रसिंह राणा; शिवाजी विद्यापीठ - आर्किटेक्ट असोसिएशनतर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २७ : ''देशातील वाढते शहरीकरण हे विकासाचे लक्षण नसून ते नाइलाजास्तव होत आहे. पाण्याअभावी शेतीचे नुकसान होते. मग रोजगाराच्या आशेने ग्रामीण भागातील लोंढे शहरांकडे वळतात. पाण्याअभावी देशातील अंतर्गत स्थलांतरण वाढले आहे. हा एक प्रकारे धोक्याचा इशारा आहे,'' असे निरीक्षण आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह राणा यांनी नोंदवले. शिवाजी विद्यापीठ आणि आर्किटेक्ट असोसिएशनतर्फे झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सभागृहात बुधवारी झालेल्या व्याख्यानात बोलताना राजेंद्रसिंह राणा. शेजारी डॉ. डी. आर. मोरे, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी.**

राजेंद्रसिंह म्हणाले, ''देशातील शहरीकरण वेगाने वाढत आहे; पण हा विकास नव्हे. पाण्याअभावी

पान२ वर »

### कोल्हापूरचे एसटीपी सर्वोत्तम

गंगा शुद्धीकरण योजनेतील सांडपाणी प्रक्रिया पाहणी माझ्याकडे होती. त्यावेळी मी हे तंत्र जवळून समजावून घेतले. त्या पार्श्वभूमीवर आज मी महापालिकेचा प्रकल्प पाहिला. हा प्रकल्प सर्वोत्तम प्रकल्प आहे, असे गौरवोद्‌गार राजेंद्रसिंह यांनी काढले.

सकाळ

# पाण्याअभावीच स्थलांतरणात वाढ

» पान १ वरून

ग्रामीण भागातील शेती संपत चालली आहे. त्यामुळे ग्रामीण लोक मोठ्या प्रमाणात शहरात रोजगारासाठी येतात. आपल्याकडील शहरीकरण हे नियोजित नसून ते नाइलाजास्तव झाले आहे. हा धोक्याचा इशारा असून, आताच पाणी प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले नाही तर देशांतर्गत होणारे स्थलांतर परदेशातही होईल. आफ्रिका आणि मध्य आशियाई देशांतून पाण्याअभावी मोठ्या प्रमाणात लोक युरोपात जात आहेत. त्यामुळे जलस्रोत स्वच्छ ठेवणे, भूगर्भातील पाणीपातळी टिकवून ठेवणे आणि सर्वच क्षेत्रांत पाणी बचत करणे ही त्रिसूत्री अवलंबली पाहिजे.''

जलसंवर्धनाविषयी ते म्हणाले, ''राजस्थानात ढग येतात; पण बरसत नाहीत. पण म्हणून आम्ही गप्प बसलो नाही. जलसंवर्धनशास्त्रातील परंपरा आणि आधुनिक तंत्र यांच्या समन्वयाने आम्ही तुरळक पावसाचे पाणीही साठवले. जमिनीत मुरवले. भूजल पातळी वाढवली. ९ नद्या पुनरुज्जीवित केल्या. दहा हजार सहाशे स्क्वेअर किलोमीटर जमीन ओलिताखाली आणली.'' या वेळी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, विनोद बोधनकर, कुलगुरू देवानंद शिंदे, आर्किटेक्ट असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, जलनायक अनिल कानडे, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, कुलसचिव विलास नांदिवडेकर, शैक्षणिक सल्लागार डी. आर. मोरे आदी उपस्थित होते.

देशात सर्वाधिक धरणे महाराष्ट्रात आहेत, तरीदेखील इथे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. कारण जलसाक्षरतेचा अभाव होता. मात्र, राज्य सरकारने जलसाक्षरता या विषयात अतिशय चांगले काम केले आहे. जलनायक आणि जलयोद्धे म्हणून आम्ही जी नावे सुचवली त्यांना सरकारने नेमले. जलसाक्षरता या विषयात महाराष्ट्र अव्वल आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सभागृहात बुधवारी झालेल्या राजेंद्रसिंह राणा यांच्या व्याख्यानाला उपस्थित विद्यार्थी.**

### देशातील पाणीदार विश्वविद्यालय

शिवाजी विद्यापीठाबद्दल राजेंद्रसिंह म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाने जलसंवर्धन चांगल्या प्रकारे केले आहे. पावसाचे पाणी येथील विद्यार्थ्यांना वर्षभर पुरते. हे देशातील पाणीदार विश्वविद्यालय बनले आहे. अन्य विद्यापीठांनाही हे अनुकरणीय आहे.''

# जलसाक्षरतेसाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे आवाहन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् ॲण्ड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, मनपा आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह अन्य.** (छाया : पांडुरंग पाटील)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पाण्यावरून होणारे तिसरे जागतिक महायुद्ध रोखायचे झाल्यास जलसाक्षरतेला पर्याय नाही. जलसाक्षरता रुजविण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् ॲण्ड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या मोहिमेंतर्गत व जागतिक जलदिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

कोल्हापूरची सुमारे चार तासांची भ्रमंती अत्यंत समाधानकारक व आनंददायी ठरल्याचे सांगून डॉ. राणा म्हणाले, जयंती आणि गोमती या नद्यांचे प्रदूषण बऱ्याच अंशी नियंत्रणात राखले असल्याचा हा आनंद आहे. कोल्हापूरची एसटीपी यंत्रणा (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) कार्यरत आहेत, ही फार महत्त्वाची बाब आहे. पाण्याचा दर्जा सुधारण्याचे काम येथे सातत्याने सुरू राहील, याची दक्षता घ्या. त्याचप्रमाणे शासनाच्या नोंदीमध्ये गोमती व जयंती या मूळच्या नद्यांची नाले म्हणून नोंद झालेली आहे. ती बदलून पुन्हा त्यांना नद्या म्हणून नोंद करण्याची प्रक्रिया आयुक्त डॉ. कलशेट्टी यांनी त्यांच्या कारकीर्दीत राबवावी.

महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, 'मी संगमेश्वर महाविद्यालयाचा विद्यार्थी; मात्र राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांत सहभागाची संधी मिळाली. पर्यावरण संवर्धनाचे धडे तिथेच गिरवले. संपूर्ण शासकीय सेवेची प्रेरणा एन.एस.एस.च्या माध्यमातून मिळाली. कोणताही उपक्रम यशस्वी होण्यासाठी त्यामध्ये लोकसहभाग अत्यंत गरजेचा आहे.'

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठ केवळ आपल्या कॅम्पसवरीलच नव्हे, तर कोल्हापूर शहरासह या जिल्ह्यातील नैसर्गिक स्रोतांच्या संवर्धनासाठीही प्रयत्नशील आहे. या परिसरातील हे नैसर्गिक वरदान टिकवून ठेवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठ सातत्याने योगदान देत राहील.

यावेळी विनोद बोधनकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, अनिल कानडे यांची प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. गौरी चोरगे, आसावरी जाधव यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. आरती परीट यांनी सूत्रसंचालन केले. वंदना कुसाळकर यांनी आभार मानले. यावेळी इंजिनिअरिंग असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य, शिक्षक, पर्यावरणप्रेमी नागरिक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यापीठ पाणीदार झाल्याचा आनंद

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या कारकीर्दीत तीन दिवस कॅम्पसवर मुक्काम केल्याची आठवण सांगताना डॉ. राणा म्हणाले, त्यावेळी डॉ. साळुंखे यांच्याशी चर्चा करताना विद्यापीठाच्या साडेआठशे एकराच्या परिसरामध्ये पाण्याच्या संदर्भात स्वयंपूर्ण होण्याची क्षमता असून, त्यादृष्टीने जलसंवर्धनाच्या योजना राबवाव्यात, असे त्यांना सांगितले होते. त्यानंतर आज या विद्यापीठाला भेट दिल्यानंतर अवघ्या दहा वर्षांत विद्यापीठ 'बेपानी से पानीदार व स्वयंपूर्ण झाल्याचे पाहून अत्यंत आनंद झाला.'

लोकमत

राजेंद्रसिंह राणा : शिवाजी विद्यापीठाने जलसाक्षरतेचा उपक्रम राबवावा; जागे व्हा पंचगंगेसाठी अभियान

# पूरमुक्तीसाठी पंचगंगेचे पुनरुज्जीवन आवश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पूरमुक्त कोल्हापूर होण्यासाठी पंचगंगा नदीचे पुनरुज्जीवन करण्यासह या नदीपात्रातील जमिनीची होणारी धूप थांबविणे आवश्यक आहे; त्यासाठी नदीपात्रालगत, त्याच्यामागे असणाऱ्या शेती, परिसरात झाडे लावणे, असलेले गवत टिकविण्याचे काम लोकांकडून व्हावे. नाला म्हणून ओळख झालेली जयंती, गोमतीला नदीचा दर्जा देण्यात यावा, असे प्रतिपादन जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी बुधवारी केले.

नसीर अत्तार




शिवाजी विद्यापीठात बुधवारी जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून विलास नांदवडेकर, अजय कोराणे, डी. आर. मोरे, देवानंद शिंदे, मल्लिनाथ कलशेट्टी, विनोद बोधनकर, जयदीप बागी, अनिल कानडी, पी. डी. राऊत उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स् अँन्ड इंजिनिअर्स कोल्हापूरतर्फे 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय जल दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी प्रमुख उपस्थित होते. डॉ. राणा म्हणाले, कोल्हापूरमधील जलस्रोत, नदीच्या पुनरुज्जीवनासाठी सुरु असलेले काम पाहून आनंद झाला.

गेल्या काही वर्षांतील चुकांमुळे जयंती, गोमती नदीची नाला नोंद म्हणून झाली आहे. ती पुन्हा नदी म्हणून होण्यासाठी आयुक्त कलशेट्टी यांनी प्रयत्न करावेत. जयंती, गोमतीमध्ये ज्या ठिकाणी सांडपाणी मिसळते, त्या ठिकाणी प्रक्रिया केंद्र उभारल्यास पाणी शुद्धिकरण प्रक्रियेचा खर्च शंभरपटीने कमी होईल. विद्यापीठ परिसरात पडणारा पाऊस, या ठिकाणी असणारी पाण्याची गरज लक्षात घेऊन जलव्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार पाऊल टाकल्याने आज विद्यापीठ पाणीदार झाले आहे. पिण्याचे आणि वापराचे पाणी स्वतंत्रपणे ठेवण्याचे चांगले व्यवस्थापन विद्यापीठाकडून होते. दर्जा, वापरानुसार पाणी स्वतंत्र ठेवल्यास त्यांच्या शुद्धिकरणासाठी कमी खर्च येतो. विद्यापीठाने महाविद्यालयांमध्ये जलसाक्षरता उपक्रम राबवावा.

आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील एनएनएसचे काम खूप चांगले आहे. जलसाक्षरतेसह लॅब टू लँड काम होणे आवश्यक आहे. 'सागरमित्र'चे संस्थापक विनोद बोधनकर म्हणाले, पर्यावरण रक्षणासाठी शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रबोधन व्हावे. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. राणा यांच्या मार्गदर्शन, प्रेरणेतून विद्यापीठाने जलव्यवस्थापन केले आहे. जलसाक्षरतेचा उपक्रम राबविला जाईल. या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. आर. मोरे, जयदीप बागी, उदय गायकवाड, गौरी चोरगे, अनिल कानडी, आदी उपस्थित होते. पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी स्वागत केले. असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स् अँड इंजिनिअर्स कोल्हापूरचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. आरती परीट, आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. वंदना कुसाळकर यांनी आभार मानले.

## लाडला बेटा बिघड ना जाये

पाण्याबाबत समृद्ध असलेल्या कोल्हापूरचा उल्लेख डॉ. राणा यांनी भगवान का लाडला बेटा है, लेकिन ये बेटा बिघड ना जाये असा केला. त्यांनी पाणी वापराचे योग्य नियोजन कोल्हापूरकरांनी करावे, असे आवाहन केले.

## जयंती नदीची परिक्रमा

डॉ. राणा यांनी बुधवारी सकाळी साडेसात वाजता जयंती नदीची हुतात्मा पार्क ते रेणुका मंदिरपर्यंतची परिक्रमा केली. त्यामध्ये त्यांनी पाणी, प्रदूषण होणारी ठिकाणे, आदींची पाहणी करून सूचना केल्या. ही नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी आम्ही करणाऱ्या कृती आराखड्यामध्ये या सूचनांचा समावेश करणार असल्याचे अजय कोराणे यांनी सांगितले. दरम्यान, व्याख्यानापूर्वी डॉ. राणा यांनी विद्यापीठातील जलव्यवस्थापनाची माहिती घेतली.

## राजेंद्रसिंह म्हणाले

- कोल्हापूरमधील 'एसटीपी' प्लँट कार्यान्वित असल्याचे पाहून आनंद
- जमिनीची धूप थांबविण्यासाठी जंगलातील गवत पेटविणे बंद व्हावे
- महाराष्ट्र सरकारने केलेले जलसाक्षरतेचे काम देशात चांगले
- दुष्काळामुळे गावातील लोक हे शहरात विस्थापित होत आहेत. ते थांबणे गरजेचे आहे
- कोल्हापूरकर तुम्हाला आठवणीत ठेवतील, असे काम कल्लशेट्टींनी करावे.

2 8 MAR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# जलसाक्षरतेत विद्यापीठाने पुढाकार घ्यावा

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा : 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' मोहिमेतून केले विद्यापीठांना आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

नागरिकांचे गावाकडून मोठ्या शहराकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होत आहे. परिणामी गावे उजाड होणे आणि शहरांवरील लोकसंख्येचा बोजा वाढणे या दोन्ही बाबी धोकादायक आहेत. त्यादृष्टीने नैसर्गिक स्रोतांचे पुनर्भरण व पुनरुज्जीवन अत्यंत गरजेचे आहे. म्हणून पाण्यावरुन होणारे तिसरे जागतिक महायुद्ध रोखायचे झाल्यास जलसाक्षरतेला पर्याय नाही. समाजात जलसाक्षरता रुजविण्यासाठी आता विद्यापीठांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स ॲन्ड इंजिनिअर्स, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या मोहिमेअंतर्गत व जागतिक जल दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्रसिंह राणा, सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. जयदीप बागी, डॉ. डी. आर. मोरे, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, अजय कोराणे, डॉ. पी. डी. राऊत.

### सांडपाण्याच्या उगमावरच जलशुध्दी करा

सांडपाणी स्वच्छ पाण्यात मिसळल्यानंतर त्याचे शुद्धीकरण करणे खूपच महाग पडते. शुद्धीकरणावरील खर्च अनाठायी वाढतो. जेथून सांडपाणी निर्माण होते, त्याच ठिकाणी त्यावर प्रक्रिया केल्यास त्याच्या शुद्धीकरणाचा खर्च कमी होऊ शकतो, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

यावेळी डॉ. राणा म्हणाले, जलसाक्षरता मोहिमेमुळे महाराष्ट्र अधिकाधिक पाणीदार होईल. जलयोद्धा आणि जलनायक नियुक्त करण्याची कल्पनाही अत्यंत महत्त्वाची ठरली. तथापी, शिवाजी विद्यापीठासह राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजना, भूगर्भशास्त्र तसेच अन्य संबंधित विषयांशी निगडित विद्यार्थ्यांची पथके तयार करून आपापल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये जलसाक्षरताविषयक जगजागृती मोहीम राबविण्याची गरज आहे. आजघडीला सर्वाधिक धरणे महाराष्ट्रात आहेत, मात्र शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्याही महाराष्ट्रातच होत आहेत. या पार्श्वभूमीवर, येथून पुढच्या काळात मध्यवर्ती सिंचन व्यवस्था ही आता कालबाह्य होऊ लागली आहे. एकविसाव्या शतकात आता जमिनीचे जल-पुनर्भरण हाच पाणी साठ्याचा संवर्धनशील उपाय आहे.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी कोणताही उपक्रम यशस्वी होण्यासाठी त्यामध्ये लोकसहभाग अत्यंत गरजेचा असल्याचे सांगितले. स्वागत अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. गौरी चोरगे, आसावरी जाधव यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. आरती परीट यांनी सूत्रसंचालन केले. वंदना कुसाळकर यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे.एस. बागी, अनिल कानडे आदी उपस्थित होते.

### जयंती आणि गोमतीची नदी म्हणून नोंद करा

जयंती आणि गोमती या नद्यांचे प्रदूषण बऱ्याच अंशी नियंत्रणात राखले आहे. कोल्हापूरची एसटीपी यंत्रणा (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) कार्यरत आहेत, ही महत्वाची बाब आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या नोंदींमध्ये गोमती व जयंती या मूळच्या नद्यांची नाले म्हणून नोंद झाली आहे. ती बदलून पुन्हा त्यांना नद्या म्हणून नोंद करण्याची प्रक्रिया राबवावी, असे आवाहन डॉ. राणा यांनी केले.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 MAR 2019

Times of India

# Rename nullahs, they were once rivers: Expert

## 'Use Different Methods To Treat Waste Water'


TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Water expert Rajendra Singh, who has helped villagers in Rajasthan manage local water resources and won the Magsaysay award in 2001 for community leadership, said on Wednesday that the Panchaganga river has several different sources of pollution, so any strategy to deal with the pollution must take into account all these different sources of water pollution.

Singh also suggested that the two nullahs were once sources of water, and should be referred to as rivers. A change in the name would make people more cautious about causing pollution in these water bodies, he said.

Singh was speaking at Shivaji University, where a seminar was organised by the university and the Association of Architects and Engineers. Singh lauded the initiative to clean up Jayanthi nullah which is the major source of pollution of the river.

TOI, BCCL, KOLHAPUR



Rajendra Singh speaks at the SUK

In the morning, he made a visit to Jayanthi nullah and Gomati nullah and remarked that the efforts of several agencies had led to decline in the pollution of the river.

"Waste water from households is released in Jayanthi nullah and industrial effluent from industrial units goes into Gomati nullah. For both these, treatment methods must be different. There is need to recycle drinking water which is wasted and goes into the nullah and it should be separately stored from polluted water. For industrial waste water, there is need for minimising pollutants in the industrial process as treatment of the industrial effluent is costly," Singh said.

Singh said both these nullahs should in reality be referred to as rivers – they have become drains, but were a source of water a few decades ago. Civic chief Mallinath Kalshetti was also at the seminar – Singh told him that a change in the names of the nullahs to rivers would greatly help in changing the attitude of residents to these water bodies.

Kalshetti suggested that student volunteers could be roped in to clean the water bodies. Vice-chancellor Devanand Shinde said the university would take up conservation work on the basis of suggestions from Singh.

28 MAR 2019

तरूण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ‘फाऊंड्री’चा मेळा

## तंत्रज्ञान अधिविभाग व मिनिस्ट्री ऑफ मायक्रो स्मॉल, मेडीयम इंटरप्रायजेस उद्यम समागमचे उद्‌घाटन





कोल्हापूर : शाहुपुरीतील मॅकनेट इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडची माहिती घेताना उद्योजक. उपस्थितांना अंबिकॉन सोल्यूशनच्या घरगुती तेल काढणाऱ्या मशिनची माहिती देताना ए. बी. पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग आणि आग्रा येथील मिनिस्ट्री ऑफ मायक्रो स्मॉल, मेडीयम इंटरप्रायजेस यांच्या सयुक्त विद्यमाने आयोजित ‘उद्‌यम समागम’चे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. विद्यापीठातील लोककला केंद्रात फाऊंड्री उद्योगाचा जणू मेळाच जमला आहे. फाऊंड्रीतील ६० कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवला असून, प्रत्येकजण आपआपल्या कंपनीची माहिती देण्यात व्यस्त झाले आहेत.

फाऊंड्री क्षेत्रातील कोल्हापूर, आग्रा, मुंबई पुणे, कोल्हापूर येथील कंपन्यांनी आपले स्टॉल मांडले आहेत. गुजरात येथील एका कंपनीने वाया जाणाऱ्या टाकाऊ कास्टींगपासून घर बांधण्यासाठी विटा तयार केल्या आहेत. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे बी. टेक., एम. टेक., व इक्युबेशन सेंटर अंतर्गत काय संशोधन चालू आहे यासंदर्भातील माहिती देणारे स्टॉल मांडले आहेत. शासकीय तंत्रनिकेतनच्या सेंटर फॉर एक्सलन्स इन जेम्स ॲन्ड ज्वेलरी सेंटर अंतर्गत सोन्याचे दागिने तयार करण्याचे ट्रेनिंग दिले जात आहे. शाहुपुरी येथील मॅकनेट इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडने इंडस्ट्रीमधील अडीच टनाचे वजन उचलणारे यंत्र तयार केले आहे. तर बँक ऑफ महाराष्ट्राच्या कर्ज सुविधांचा स्टॉल लावला आहे. इंडस्ट्रीमधील कास्टींगचा पुनर्वापर कसा करायचा यासंदर्भात स्टॉल आहेत. असे जवळपास ५० स्टॉल तसेच फ्रिज, वॉटर कुलर, ड्रेस, टाकाऊपासून टिकाऊ कापडी बॅग, बटाटा वेफर्स, केमिकल विरहीत हळद, घरगुती ऑईल मशिन, फाउंड्री सेक्टर, इंटरनेट, मार्केटिंग, अशा विविध उपक्रमांची माहिती देणारे स्टॉल असे ६० स्टॉल आहेत. २० महिला उद्योजकांचा सहभाग आहे. इंडस्ट्रीमधील अनेक कंपन्यांचे मालक, मॅनेजर, व अन्य प्रतिनिधींनी स्टॉल पाहण्यासाठी गर्दी केली होती. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सर्व स्टॉलला भेटी देवून माहिती घेतली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, तंत्रनिकेतन अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, डॉ. ए. के. साहू, डॉ. एस. बी. काळे, मिनिस्ट्री ऑफ मायक्रो स्मॉल, मेडीयम इंटरप्रायजेस कोल्हापूरचे सहायक संचालक पी. आर. जोशी, प्रतीक पराशर आदी उपस्थित होते.

लोकमत

शिवाजी विद्यापीठ : विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती; तज्ज्ञांचे मार्गदर्शन; विविध कंपन्यांचे स्टॉल

# नवतंत्रज्ञान, कास्टिंग पुनर्वापराची प्रदर्शनातून माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** फौंड्री उद्योगातील कास्टिंगच्या पुनर्वापराबाबत मार्गदर्शन आणि नवतंत्रज्ञानाची माहिती शिवाजी विद्यापीठातील उद्योग मेळावा प्रदर्शनातून बुधवारी विद्यार्थ्यांना मिळाली. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग आणि केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे (एमएसएमई) हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

विद्यापीठातील लोककला केंद्रातील या मेळाव्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ.

नसीर अत्तार



शिवाजी विद्यापीठात बुधवारी उद्योग मेळावा प्रदर्शनाचा प्रारंभ झाला. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

डी. आर. मोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, कार्यक्रम समन्वयक एस. बी. काळे, 'एमएसएमई'चे पी. आर. जोशी, प्रतीक पराशर उपस्थित होते. या प्रदर्शनात कोल्हापूर, मुंबई, पुणे आणि आग्रा येथील फौंड्री क्षेत्रांतील विविध कंपन्यांनी स्टॉल मांडले आहेत. विविध स्वरुपातील वजन उचलणारे यंत्र, टाकाऊ कास्टिंगपासून विटा तयार करणे, या कास्टिंगचा पुनर्वापर करणे, आदी, तंत्रज्ञानाची माहिती त्यांच्या माध्यमातून देण्यात येत आहे. २० महिला उद्योजकांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला आहे. प्रदर्शनातील दिवसभरातील विविध सत्रांमध्ये मनीष कोठारी (इंटिग्रेटिंग इंडियन फौंड्रीज् इनटू ग्लोबल व्हॅल्यू चेन), डॉ. पी. एस. पाटील (स्मार्ट मटेरिअल), मनीष पाटील (स्टार्टअप), भगवान चंदनानी (फायनान्शीयल असिस्टंट टू एमएसएईएस) यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बागी यांच्या उपस्थितीत 'इंडस्ट्रीज ०.४' या विषयावर गटचर्चा झाली. प्रदर्शनासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकीसह अन्य महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली.

## आज मार्गदर्शन करणारे तज्ज्ञ

या प्रदर्शनात आज, गुरुवारी दिवसभरात पी. आर. जोशी (एमएसएमईच्या योजना), डॉ. पी. डी. राऊत (टाकाऊपासून पुनर्निर्मिती), शशांक मांडरे (सँड रिक्लेमेशन), विनय मगदूम (लीन मॅन्युफॅक्चरिंग), शीतल केटकाळे (पॅटर्न मेकिंग ट्रेंड), नितीन वाडीकर (ॲटोमेशन इन फौंड्री इंडस्ट्रीज), पुष्कर जनवारकर (लेटेस्ट डेव्हलपमेंट इन इन्स्ट्रुमेंटेशन) मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी

# भगवान महावीर यांचे विचार प्रेरणादायी

## रावसाहेब पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनीधी**

भगवान महावीर यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठ महावीर अध्यासनाच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी पाटील यांनी महावीर अध्यासनाचे काम चांगल्या पद्धतीने चालले आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत भगवान महावीर यांचे विचार पोहोचवण्याचे काम प्रभावीपणे सुरू आहे. महावीर अध्यसनाचे काम आणखी गतीने होण्यासाठी स्वतंत्र इमारतीची गरज आहे, असे सांगितले.



**कोल्हापूर : महावीर अध्यासनाच्या वतीने आयोजित व्याख्यानाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना रावसाहेब पाटील. शेजारी महावीर शास्त्री, प्रा. व्ही. बी. ककडे, अण्णासाहेब चोपडे, भालचंद्र पाटील आदी.**

यावेळी अण्णासो चोपडे म्हणाले, जैन धर्म ही जीवन जगण्याची पद्धती आहे.

जे अहिंसेचे पालन करतात ते सर्व जैन धर्मियांच्या विचारांचे आचरण करणारे ठरतात. डॉ. महावीर शास्त्री यांनी भगवान महावीर यांचे विचार स्वीकारल्यास युद्धावर होणारा अनावश्यक खर्च कमी होऊन तो देश विकासासाठीवापरणेशक्यहोईल,असे सांगितले.

अध्यासनाचे समन्वयक प्रा. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले. यावेळी लक्ष्मीसेन महाराज, सुरेश रोटे, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. बी. डी. खणे, अनिल पाटील, डॉ. पद्मजा पाटील, प्रा. संदीप पाटील, डॉ. जे. एफ. पाटील उपस्थित होते.

# संतांच्या अभंगातून समाजप्रबोधन

## प्राचार्य धोंडगे : संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संतांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम केले. समाजामध्ये आजही संत तुकारामांच्या अभंगांचा सर्वाधिक प्रभाव आहे, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्राचार्य दिलीप धोंडगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने संत तुकाराम व्याख्यानमालेत तुका झालासे कळस या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

प्रा. धोंडगे म्हणाले, महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणात आहे. अभंगातून मानवी जीवनाला जीवनरस पुरवण्याचे काम केले




**कोल्हापूर : संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित व्याख्यानात बोलताना प्राचार्य दिलीप धोंडगे, छायाचित्रात डावीकडून नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, अक्षय सरवदे.(छाया : तय्यब अली)**

आहे. प्रत्येक व्यक्तीचे जीवन समृद्ध करण्याचा मार्ग हा अभंग आहे. भक्तीतून मोक्ष मिळतो व त्यातून आपल्या आयुष्यात चिरस्थायी स्वरूपाचा बदल होऊ शकतो हे तुकाराम महाराजांनी सांगितले आहे. ब्रिटिश काळातील अनेक अधिकारी हे तुकाराम महाराजांचे अभंग समजून घेत असत. यातूनच मुंबई विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरूंनी तुकारामांच्या अभंगांचे संकलन केले. कालांतराने यातील अनेक अभंगांचे भाषांतर होऊन तमिळनाडू, केरळ येथे आजही तुकारामांचे अभंग म्हटले जातात.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी संतसाहित्याचा समाजमनावर प्रभाव असल्याचे सांगितले. यावेळी अध्यासनाचे प्रमुख नंदकुमार मोरे यांनी अभंगामुळे साहित्याकडे पाहण्याचा नवा आयाम तयार झाला आहे, असे सांगितले.

मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अक्षय सरवदे उपस्थित होते.

# 'इम्प्रेस' मधील प्रकल्प विद्यापीठाला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या संशोधन प्रकल्पाला नवी दिल्लीच्या भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषदेने सुमारे नऊ लाख रुपये अनुदान मंजूर केले. परिषदेच्या 'इम्प्रेस' योजनेखाली शिवाजी विद्यापीठाला मंजूर झालेला हा पहिलाच प्रकल्प आहे. डॉ. महाजन यांनी 'इव्होलूशन ऑफ प्रधानमंत्री जनधन योजना अँड रोड मॅप अहेड,' या विषयावर प्रस्ताव सादर केला होता.

वित्तीय वंचितता आणि वित्तीय सामावेशनाचे पर्याय या विषयींच्या धोरण निश्चितीमध्ये प्रधानमंत्री जनधन योजना अस्तित्वात आली. ही योजना जगातील सर्वांत मोठी वित्तीय समावेशन योजना म्हणून गणली गेली. मोठ्या प्रमाणात बँक खाती उघडली गेली. परंतु, खऱ्या अर्थाने लाभधारकांचे वित्तीय समावेशान झाले काय, हा अभ्यासाचा विषय आहे. प्रत्यक्ष ही खाती किती प्रमाणात सक्रीय आहेत आणि किती प्रमाणात निष्क्रिय आहेत, याचा अभ्यास या प्रकल्पांतर्गत केला जाणार आहे.



प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या संशोधन प्रकल्पाचे मंजूर पत्र देताना प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

संशोधनाचा उपयोग धोरण निश्चिती व धोरणातील बदल यासाठी व्हावा या उद्देशाने भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषदेने 'इम्पॅक्टफुल पॉलिसी रिसर्च इन सोशल सायन्स' (इम्प्रेस) ही नवी योजना सुरु केली. डॉ. महाजन यांना मंजूर झालेला या योजनेंतर्गत असलेला शिवाजी विद्यापीठातील पहिला प्रकल्प आहे. हा प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.


डॉ. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी पीएचडी व ११ विद्यार्थ्यांनी एमफिल पदवीसाठीचे संशोधन पूर्ण केले आहे. सध्या ७ विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडीसाठी संशोधन करीत आहेत.

लोकमत


**मतदानाच्या वेळेतही बचत : शिवाजी विद्यापीठातील मल्लिकार्जुन भिसे याचे संशोधन**

# बायोमेट्रिक मतदान यंत्र; बोगस मतदानाला आळा

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : बायोमेट्रिक प्रणालीचा वापर करुन मल्लिकार्जुन प्रभू भिसे याने व्होटिंग मशीन (मतदान यंत्र) साकारले आहे. त्यामध्ये मतदारांना बोटांच्या ठशांद्वारे (फिंगरप्रिंट) मतदान करता येते. या मशीनचा वापर केल्यास मतदानाच्या वेळेत बचत होणार असून, बोगस मतदानाला आळा बसेल, असा दावा त्याने केला आहे.



चाकूर (जि. लातूर) येथील मल्लिकार्जुन शिवाजी विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्समध्ये एम.एस्सी.च्या द्वितीय वर्षामध्ये शिकत आहे. त्याने बोटांच्या ठशांवर आधारित असलेले 'फिंगरप्रिंट बेस्ड व्होटिंग मशीन' साकारले आहे. फिंगरप्रिंट मोड्यूल, आरडीनो (एव्हीआर मायक्रो कंट्रोलर) स्विच, डिस्प्ले, एलईडी यांच्या वापरातून हे यंत्र तयार केले आहे.

मतदाराचे फिंगरप्रिंट प्रथम घेतले जाईल. त्याची पडताळणी यंत्रातील माहितीबरोबर करण्यात येईल. संबंधित मतदाराची फिंगरप्रिंट व यंत्रातील माहिती जुळल्यानंतर त्याला मतदानाची परवानगी केंद्रप्रमुख देतील. त्यासाठी त्यांनाही फिंगरप्रिंटचा वापर करावा लागेल. एखादा मतदार दुसऱ्यांदा मतदानासाठी आला, तर फिंगरप्रिंटद्वारे त्याला ओळखले जाईल व संबंधित यंत्रातील लाल एलईडी लागून बझर वाजेल. दुबार मतदानाला आळा बसणार आहे. संबंधित यंत्राच्या माध्यमातून मतदान करण्यासाठी ओळखपत्र वापरावे लागणार नाही.

## 'आधार'ची माहिती समाविष्ट करावी लागणार

'फिंगरप्रिंट बेस्ड' मतदान यंत्रामध्ये पहिल्यांदा भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडील (यूआयडीआय) प्रत्येकाची 'आधार'बाबतची माहिती समाविष्ट करावी लागणार आहे. या यंत्रामध्ये पाच हजार जणांची माहिती समाविष्ट करता येते. यंत्र सुरक्षिततेसाठी त्यात केंद्रप्रमुख, निवडणूक अधिकाऱ्याचे फिंगरप्रिंट, लॉगीन आयडी असणार आहे. फिंगरप्रिंटने प्रक्रिया होईल. साडेतीन हजारांत हे यंत्र तयार केले आहे. त्यासाठी डॉ. एम. के. भानारकर यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे मल्लिकार्जुन याने सांगितले.

> 'ईव्हीएम' मशीन प्रगत करण्याच्या उद्देशाने मल्लिकार्जुन याने संशोधनातून 'फिंगरप्रिंट बेस्ड' मतदान यंत्र साकारले आहे. प्रमाणीकरण करणाऱ्या संस्थेकडून त्याची तपासणी करून पेटंटसाठी अर्ज करण्यात येईल.
>
> \- डॉ. एम. के. भानारकर, मार्गदर्शक

पुढारी

# विद्यापीठाचे तंत्रज्ञान थेट बांधावर

## शिवाजी विद्यापीठ व कृषी विभागाचा उपक्रम; केळीच्या रोपांची निर्मिती

**कोल्हापूर : संग्राम घुणके**

शिवाजी विद्यापीठाकडून ऊतीसंवर्धन तंत्रज्ञान आता शेतकऱ्यांच्या बांधावर निघाले आहे. ऊतीसंवर्धन तंत्रज्ञानाद्वारे लाखो केळीची रोपे तयार करण्यात येत आहेत. विद्यापीठ व कृषी विभाग यांच्यातर्फे हा संयुक्त उपक्रम राबविण्यात येत आहे. या रोपांचे माफक किमतीत कोकण विभागातील शेतकऱ्यांना लागवडीसाठी वितरण होणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, ही केळी अनुदानास पात्रही राहणार आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुका, कोकण परिसरात 'गोवामंडोल' ही केळीची नैसर्गिक प्रजाती आढळते. २० फूट उंच झाड व सोनकेळीसारखा मोठा केळीचा घड असतो. एका घडापासून ३० ते ३५ किलो उत्पादन कोकण परिसरात मिळते. या केळीची जात शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांच्या प्रयत्नांतून २०१५ साली विकसित करण्यात आली. यापूर्वी तेथील शेतकऱ्यांकडून पारंपरिक पद्धतीने केळी लागवड केली जात होती. या लागवडीदरम्यान रोपात विषाणू संसर्ग होऊन रोपे मरण्याचे प्रमाण ४० टक्के होते. ऊतीसंवर्धनाद्वारे रोपे विकसित केल्यामुळे निरोगी रोपनिर्मिती होत असून, रोपे मरण्याचे प्रमाण पूर्णत: घटले आहे.

> विद्यापीठातील ज्ञानाचा शेतकरी, समाजातील लोकांना उपयोग करून देण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. यामधून शेतकरी स्वावलंबी होण्यास हातभार लागणार असून, असे नवनवीन उपक्रम विद्यापीठातर्फे यापुढे राबविण्यात येणार आहेत.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

या रोपांच्या प्रयोगानंतर ही विकसित झालेली रोपांची कोकण कृषी विभागाकडून विद्यापीठाकडे काही दिवसांपूर्वी मागणी करण्यात आली. पहिल्या वर्षी १ लाख केळीच्या रोपांची मागणी केली आहे. ही रोपे विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाच्या लॅबमध्ये विकसित करण्यात येणार आहेत. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने नुकतीच मान्यताही दिली आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी या परिसरातील शेतकऱ्यांना ही रोपे लागवडीसाठी उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

पान ४ वर

पुढारी

# विद्यापीठाचे तंत्रज्ञान थेट बांधावर

(पान १ वरून) यासाठी विद्यापीठ वनस्पतिशास्त्र विभागाचे आजी-माजी विद्यार्थी यांना प्रशिक्षण देणार असून, विद्यार्थ्यांना याद्वारे चांगली संधीही उपलब्ध होणार आहे.

**फणस, कोकम, सुगंधी वनस्पतींबाबत संशोधन**

कापा व बरका असे फणसाचे प्रकार आहेत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने फणसाचे झाड लावल्यास त्या झाडाला कापा की बरका फणस लागेल हे सांगता येत नाही. त्यासाठी काही फणसाच्या झाडांना बुंध्यासह फांद्यांनाही फणस लगडलेले असतात. अशा कापा फणसाच्या झाडाच्या ऊतीसंवर्धनाद्वारे कापाच फणस देणारी, चांगले उत्पन्न देणारी रोपे विकसित करण्यात येत आहेत. तसेच कोकमच्या झाडामधील मादी झाडालाच फळे लागतात.

कोकमच्या नर झाडाला फळे लागत नाहीत. वनस्पतिशास्त्र विभागातर्फे फक्त मादी झाड तयार करण्याचे तंत्रज्ञान यापूर्वीच विकसित करण्यात आले. याचीही रोपे तयार करण्याचे काम लॅबमध्ये सुरू असून, भविष्यात शेतकऱ्यांना ही रोपे उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. तसेच जिरॅनियम, पचौली व वेखंड या सुगंधी वनस्पतींपासून सुगंधी द्रव्ये तयार करण्यात आली असून, यामधील जिरॅनियमची लागवड काही शेतकऱ्यांनी केली आहे. त्याचाही प्रयोग सध्या सुरू आहे.

My Kolhapur Edition
28 Mar, 2019 Page No. 4
Powered by : erelego.com

पुढारी

# विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे खेळाडूंचा उद्या गुणगौरव

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे २०१७-१८ सालात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ शुक्रवारी (दि. २९) सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात होत आहे. आंतरराष्ट्रीय नेमबाज गिरीजा पाटील-देसाई या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थितीचे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे प्र. संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

My Kolhapur Edition
28 Mar, 2019 Page No. 2
Powered by : erelego.com

लोकमत

**शिवाजी विद्यापीठाचा पर्याय : विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही; विद्यापीठाची महाविद्यालयांना सूचना**

# प्रवेशपत्रावर छायाचित्र नसल्यास आधार, पॅनकार्ड दाखवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांच्या पहिल्याच दिवशी मंगळवारी (दि. २६) काही विद्यार्थ्यांना छायाचित्रांविना प्रवेशपत्र मिळाल्याने गोंधळ उडाला. अशी प्रवेशपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांनी त्यावर आपले छायाचित्र लावून ते महाविद्यालय अथवा विद्यापीठातील जबाबदार अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून घ्यावे. ते करता आले नाही, तर या विद्यार्थ्यांनी शासनग्राह्य ओळखपत्र (आधार, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट) पर्यवेक्षकांना दाखवावे, असा पर्याय विद्यापीठाने बुधवारी काढला.

त्याबाबतच्या सूचना विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांना दिल्या आहेत.

विविध अभ्यासक्रमांच्या पहिल्या आणि द्वितीय वर्षातील पहिल्या सत्रातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांमध्ये चुका झाल्या आहेत. त्यांचे प्रमाण साधारणत: ३५ टक्क्यांपर्यंत आहे.



प्रवेशपत्र आणि पदवी प्रमाणपत्रांतील चुकांच्या दुरुस्तीसाठी विद्यापीठ प्रशासनाने बैठक घेतली. त्यासाठी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते. त्यामध्ये या तांत्रिक चुकांची माहिती घेऊन ती दुरुस्त करण्याचा निर्णय झाला. त्यासह महाविद्यालयातील प्राचार्य, रजिस्ट्रार अथवा विद्यापीठातील जबाबदार अधिकाऱ्यांकडून प्रवेशपत्र प्रमाणीकरण करणे, शासनग्राह्य ओळखपत्र दाखविणे असे पर्याय निश्चित करण्यात आले. या निर्णयानुसार कार्यवाही करण्याची सूचना प्रशासनाने महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिल्या. प्रवेशपत्रांतील त्रुटी, चुकांमुळे एकही विद्यार्थी परीक्षेपासून व वंचित राहणार नाही, याची दक्षता विद्यापीठाकडून घेतली जाईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

## संगणक प्रणालीतील त्रुटींचा फटका

संगणक प्रणालीतील त्रुटींमुळे काही प्रवेशपत्रांवर छायाचित्र अपलोड झालेली नाहीत. ही त्रुटी दूर करण्याची सूचना संगणक प्रणाली पुरविणाऱ्या ठेकेदाराला केली आहे. किती विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांमध्ये चुका झाल्या आहेत. त्याची माहिती संकलित केली जात आहे. तोपर्यंत विद्यापीठाने निश्चित केलेल्या पर्यायांची माहिती महाविद्यालयांना दिली असल्याचे प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले. ते म्हणाले, पदवी प्रमाणपत्रांमध्ये मुळात चुकीची माहिती सादर झाल्याने त्यामध्ये चुका झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रांमध्ये चुका झाल्या आहेत. त्यांनी विद्यापीठातील दीक्षान्त विभागाशी संपर्क साधावा. त्यांना प्रमाणपत्र बदलून दिले जाईल.

लोकमत

दिलीप धोंडगे : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने संत तुकाराम व्याख्यानमाला

# तुकाराम गाथा म्हणजे मर्मबंधातली ठेव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्राची संस्कृती म्हणजे वारकरी संप्रदाय आणि या सांस्कृतिक संप्रदायाचे संत तुकाराम महाराज हे गाभा आहेत. त्यांचे 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' हा अभंग म्हणजे मानवतेचे तत्त्वज्ञान आहे. म्हणूनच ब्रिटिशांपासून ते खेड्यापाड्यातल्या माणसांपर्यंत प्रत्येकजण या गाथेला आपल्या अंतकरणात मर्मबंधाची ठेव असल्याप्रमाणे जपतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी बुधवारी केले.

शाहू स्मारक भवनात शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संत तुकाराम व्याख्यानमालेत त्यांनी 'तुका झालासे कळस' या विषयावर अतिशय सोप्या आणि मार्मिक शब्दात विवेचन केले. व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अक्षय सरवदे उपस्थित होते.




**शाहू स्मारक भवनात बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी विवेचन केले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्रा. रणधीर शिंदे, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, अक्षय सरवदे उपस्थित होते.**

धोंडगे म्हणाले, महाराष्ट्राच्या संत परंपरेला तत्त्वज्ञानाचा आधार आहे. गेली ९०० वर्षे हा संप्रदाय टिकविण्याचे काम खेड्यापाड्यातल्या वारकऱ्यांनी केला आहे. संत तुकारामांनी तुकाराम गाथेतून सामाजिक दांभिकता, अंधश्रद्धा अशा अनुचित रुढींवर प्रहार करत, जाणीवजागृती केली व जगण्याचे खरे मर्म सांगितले. म्हणून सर अलेक्झांडरसारखा ब्रिटीश अधिकारीही तुकारामांना 'नॅशनल पोएट' म्हणून संबोधतो, त्यांच्यावर विशेष लेख लिहितो. ब्रिटिशांनी तुकाराम गाथेचा पहिला खंड १८६९ साली व दुसरा खंड १८७२ साली प्रसिद्ध केला. त्याकाळी शासनाच्या अनुदानाने प्रसिद्ध झालेला हा पहिला ग्रंथ होता. तुकाराम गाथा ही वैश्विक असून, तिला सीमा, भाषा आणि संस्कृतीचे बंधन नाही; त्यामुळेच प्रत्येकजण तिला आपल्या हृदयात जपून ठेवतो.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी अध्यक्षीय समारोप केला. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित होते.

# पदवी प्रमाणपत्र बदलून देणार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने यावर्षी दिलेल्या पदवी प्रमाणपत्रांत काही चुका असतील तर ते प्रमाणपत्र बदलून देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

नाव, विषय व छायाचित्रांमध्ये झालेल्या चुकांबाबत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आल्या आहेत. विद्यापीठातील विभागांमधील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार प्रत्येक कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक पदवीप्रमाणपत्रे प्रदान करावीत, अशा सूचना होत्या. त्यानुसार महिनाभरात २६ महाविद्यालयांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करून प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यामध्ये काही चुका असल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले.

दरम्यान, हॉल तिकिटवर फोटो नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलमध्ये जाण्यास प्रतिबंध करण्यात आला. असे फोटो नसतील तर विद्यार्थ्यांनी स्वतःच फोटो लावून त्याच्यावर प्राचार्यांची सही घ्यावी, अशी सूचना कुलगुरूंनी केली आहे.